**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

पुणे पोलीस

**प्रेसनोट क्र.३०१४ दि. १७/०९/२०१९**

## प्रेस नोट दिनांक - १८/०९/२०१९

## कॉसमॉस बॅंकेच्या गुन्ह्यामध्ये तीन आरोपींना सायबर पोलीस स्टेशनमार्फत अटक

दि.११/०८/२०१८ रोजी कॉसमॉस बॅंकेचे रजिस्टर्ड ऑफीस, कॉसमॉस टॉवर, गणेशखिंड रोड, पुणे येथील भारताच्या मुख्यालयात असलेल्या ए.टी.एम. स्विच (सर्व्हर) वर कुणीतरी अज्ञात इसमाने, फौजदारी पात्र कट रचुन, अज्ञात मालवेअरचा अटॅक करुन, बॅंकेच्या काही व्हीसा व रुपे डेबीट कार्ड धारकांची माहिती चोरुन, त्याद्वारे व्हीसा डेबिट कार्ड द्वारे एकुण रु. ७८,००,००,०००/- चे व्यवहार भारताबाहेर झाले असुन रुपे डेबिट कार्ड द्वारे रु.२,५०,००,०००/- चे व्यवहार भारतात झालेले आहेत, असे एकुण १४,८४९ व्यवहार व त्याद्वारे अंदाजे रु. ८०,५०,००,०००/- (ऐंशी कोटी पन्नास लक्ष रु.) फसवणुक झाली होती. तसेच दि.१३/०८/२०१८ रोजी ११.३० वा.स्विफ्ट ट्रान्झॅक्शन इनिशिएट करुन हॅंगसेंग बॅंक,हॉंगकॉंग या बॅंकेच्या ए. एल.एम.ट्रेडिंग लिमीटेड,हॉंगकॉंग च्या बॅंक खात्यावर १३ कोटी ९२ लक्ष रुपये जमा करुन ते काढुन घेतले. अशाप्रकारे कॉसमॉस बॅंकेची एकुण ९४ कोटी ४२ लक्ष रुपयांची फसवणुक झाली होती. त्यानुसार चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन गु.र.नं.३६६/२०१८ भा.दं.वि.कलम १२०(ब),४२०,४६७,४६८,४६९,४७१,३४ सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ४३(ए),(बी),(सी),(ई),(जी)(आय)६५,६६,६६(सी),६६(डी),८४(बी),८५ अन्वये गुन्हा दाखल आहे.

गुन्ह्याचे गांर्भीय पाहता सदर गुन्ह्याचा तपास सायबर पोलीस स्टेशन कडे देण्यात आला होता. तपासा दरम्यान सायबर पोलीस स्टेशनने एन.पी.सी.आय.,व्हिजा व बॅंकेकडुन प्राप्त माहितीचे तांत्रीक विश्लेषण केले असता भारतामधुन कोल्हापुर, मुंबई, अजमेर, जयपुर व इंदौर या ठिकाणावरुन आरोपींनी पैसे काढल्याचे दिसुन आले. सदर ठिकाणी पथके पाठवुन तांत्रीक माहिती गोळा करण्यात आली. सदर माहितीच्या विश्लेषणावरुन कोल्हापुर, अजमेर, इंदौर व मुंबई येथील टोळ्यांमधील १५ आरोपींना यापुर्वीच अटक करण्यात आली आहे. दाखल गुन्ह्याचा तांत्रिक तपास अद्यापही सुरु असुन त्यानुसार इंदौर येथे पैसे काढणाऱ्या आरोपींकडुन त्यांचे साथीदारांबाबत माहिती मिळविण्यात आली होती व ते नौपाडा पोलीस स्टेशन,ठाणे शहर,गुन्हा रजि.नं. २६३/२०१९ भा.दं.वि.क. ४२०,४६५,४६७, ४६८,४६९,४७१,३४ या गुन्ह्यामध्ये अटक असून ते न्यायालयीन कोठडी मध्ये ठाणे कारागृहामध्ये असलेबाबत माहिती मिळाल्याने सदर आरोपी नामे १) शाबाज मोहंमद आरिफ खत्री उर्फ रेहान अली खान,वय-३० वर्षे,रा.फ्लॅट नं.३०६,बिल्डींग नं.१०, शैलेश नगर,मुंब्रा,ठाणे, २) आसिफ जमिल शेख वय-३१ वर्षे, रा.महावीर नगर, डी/१,पहिला मजला,रुम नं.१०२, १०३, पिंट्या नर्सिंग होम शेजारी, मुंब्रा देवी रोड, मुंब्रा, ठाणे ३) फिरोज यासीन शेख, वय-३७ वर्षे, रा.चटई चाळ,रुम नं.५,चाळ नं.९,काळा चौकी, कॉटन ग्रीन मुंबई यांना प्रोडक्शन वॉरंट ने ठाणे मध्यवर्ती कारागृह येथुन ताब्यात घेवून काल दि.१७/०९/२०१९ रोजी २१.०० वा.अटक करण्यात येवून आज रोजी मा. न्यायालयामध्ये त्यांना हजर केले असता त्यांची पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली आहे.

अटक आरोपींकडे केले तपासात आरोपी नामे १) शाबाज मोहंमद आरिफ खत्री उर्फ रेहान अली खान याने जयपुर,राजस्थान येथील एटीएम मधुन ५,००,०००/- रुपये व आरोपी २) आसिफ जमिल शेख व ३) फिरोज यासीन शेख यांनी त्यांचे यापुर्वी अटकेतील दोन साथीदारांच्या मदतीने इंदौर,मध्यप्रदेश येथील एटीएम सेंटर मधुन ५३,७२,०००/- रुपये काढले असल्याचे आरोपींनी कबुल केले असून तसे त्यांचे सी.सी.टी.व्ही.फुटेज देखील यापुर्वीच प्राप्त झालेले आहेत.

सदरची कामगिरी श्री.संभाजी कदम, पोलीस उप-आयुक्त, आ.व सा.यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी जयराम पायगुडे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सायबर पोलीस स्टेशन यांच्या पथकाने केली.